जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते कि, माझे अशील हे येथे खालील लिखित परिशिष्टात अधिक तपशीलवारपणे वर्णिलेल्या मिळकतीच्या (यानंतर **सदर मिळकत** असे उल्लेखित) खरेदीच्या संदर्भात **श्री. यासर अनिस पटेल आणि सौ. नसीम यासर पटेल** यांच्यासह वाटाघाटी करत आहेत.

कोणत्याही व्यक्तीस वा व्यक्तींना सदर मिळकतीच्या संबंधात कोणतेही दावे किंवा हक्क असल्यास जसे कि, वारसा, निर्वाह, अंत्यदान, भेट, विक्री, गहाण, प्रभार, न्यास, भाडेपट्टा, धारणाधिकार व/वा ताबा, भार, परवाना, प्रलंबित वाद, सुविधाधिकार, कोणताही करार वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे अधोहस्ताक्षरित यांना खालील निर्देशित पत्यावर त्यांचे तसे दावे जर काही असल्यास सर्व संबंधित दस्तावेज यांच्यासह सदर सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे. कसूर केल्यास तशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावे जर काही असल्यास ते त्यागित मानले जातील आणि माझ्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

वरील उल्लेखित सदर मिळकतीचे परिशिष्ट:

बोरिवली ग्रामपंचायत आणि उप-विभाग आणि उप-नोंदणीकृत कार्यालय भिवंडी आणि विभाग आणि जिल्हा ठाणेच्या हद्दीमध्ये स्थित सर्वे क्र. २८, हिस्सा क्र. ७, मोजमापित ०-०९-७० (हेक्टर आर प्रति), मोजमापित पॉट खराबा - ०६-३० (हेक्टर आर प्रति) एकूण मोजमापित ०-१६-० (हेक्टर आर प्रति) (१६०० चौ. मी.) धारक जमीन म्हणजेच शेतजमिनीचे ते सर्व भाग आणि विभाग.

सदर दिनांक १५ जून, २०२३.

ऍड. इरशाद मोमीन
३०१, दुकान क्र. १७, रेहमान कॉम्प्लेक्स, बाघ ई फिरदौस मार्केटजवळ, ४था निजामपूरा, भिवंडी, जि. ठाणे ४२१३०२

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट ब्रांच :
१०४, तळ मजला, भारत हाऊस, मुंबई, समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर: ०२२-२२६१५२०१ **ईमेल:** samvmumbai@unionbankofindia.bank

कब्जा सूचना
(नियम-८(१) पहा) (स्थावर व जंगम मिळकतीकरिता)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता, **युनियन बँक ऑफ इंडिया** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट), रुल्स २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **१०.०१.२०१५** रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार **मे. ओशिया इंडस्ट्रिज प्रा. लि.** यांना सदर सूचनेत नमूद रक्कम **रु. २५,३५,२४,६४७.११ (रुपये पंचवीस कोटी पस्तीस लाख चोवीस हजार सहाशे सत्तेचाळीस आणि अकरा पैसे मात्र) १०.०१.२०१५ रोजीस सह व्याज, परिव्यय, प्रभार इ.** या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार/हमीदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा** त्यांना सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्याला/तिला प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **१३ जून, २०२३ रोजीस** घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **युनियन बँक ऑफ इंडियाच्या** रक्कम **रु. २५,३५,२४,६४७.११ (रुपये पंचवीस कोटी पस्तीस लाख चोवीस हजार सहाशे सत्तेचाळीस आणि अकरा पैसे मात्र) १०.०१.२०१५रोजीस** आणि त्यावरील पुढील व्याज, परिव्यय आणि अन्य प्रभाराच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तांच्या भरणाकरीता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये ॲक्टच्या कलम १३(८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधुन घेतले जात आहे.

गहाण मिळकतीचे वर्णन:

अनु. क्र.	मिळकत पत्ता
१.	कार्यालय क्र. ३२०, ३ रा मजला, ई विंग, अरोरा टॉवर्स प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि., ९, मोलेदिना रोड, पुणे - ४११००१. मोजमापित ६४७ चौ. फू. बिल्टअप क्षेत्र आणि ५९१ चौ. फू. चटई क्षेत्र **उत्तर:** हॉटेल अरोरा टॉवर, **दक्षिण:** अंतरिम रस्ता, **पूर्व:** मोलेडिना रोड **पश्चिम:** क्लोव्हर सेंटर

सही/-
दिनांक : १३.०६.२०२३ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण: मुंबई **युनियन बँक ऑफ इंडिया**

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सूचनेवरून मी खालील नमूद मिळकतीसाठी दिनांक १९-१०-१९९२ रोजीच्या नोंद. क्र. बीओएम/डब्ल्यु-के/डब्ल्यु/एचएसजी/टीसी/७०३०/१९९२-९३ अंतर्गत महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ऍक्ट, १९६० च्या तरतुदींतर्गत रीतसर नोंदणीकृत असलेली सोसायटी दौलतराव देसाई नगर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, ज्यांचा नोंदणीकृत पत्ता येथे प्लॉट क्र. १४५ आणि १४६, मॉडेल टाऊन, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३ यांच्या नामाधिकारांची तपासणी करत आहे.

कोणतीही व्यक्ती/व्यक्तींना खालील नमूद परिसर, पार्किंग किंवा शेअर्स किंवा त्यावरील कोणत्याही भागामध्ये कोणताही करार, विक्री, हस्तांतर, गहाण, प्रभार, धारणाधिकार, भार, भेट, अंत्यदान, सोडवणूक, अदलाबदल, सुविधाधिकार हक्क, करार आणि स्थिती, कुळवहिवाट, भोगवट्याचा हक्क, अभिहस्तांकन, भाडेपट्टा, उप भाडेपट्टा, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भागीदारी विलेख, कर्जे, वापर, ताबा, विभागणी, विश्वस्त, वारसा, थकीत कर आणि/किंवा कर, देणी आणि निर्वाह, जप्ती, निषेधाज्ञा, हुकूम, आदेश, पुरस्कार, प्रलंबित वाद आणि/किंवा त्यांच्या ताबा/ कस्टडीमध्ये असलेल्या नामाधिकारांच्या मूळ दस्तावेजांच्या सुकृताद्वारे किंवा अन्य कसेहीच्या मार्गे कोणत्याही प्रकारचा कोणताही दावा, मागणी, शेअर, हक्क्क, नामाधिकार आणि/किंवा हितसंबंध असल्यास तसे लिखित स्वरूपात दस्तावेजी पुराव्यांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय ए/१०४, अर्पिता अपार्टमेंट्स, राजाराम तावडे रोड, म्हात्रे वाडी, दहिसर (पश्चिम), मुंबई ४०००६८ येथे सदर तारखेपासून चौदा दिवसांत कळविणे आवश्यक आहे. अन्यथा तसे दावे जर काही असल्यास त्यांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय तपासणी पूर्ण होईल आणि ते त्यागित मानले जातील.

वरील उल्लेखित परिशिष्ट:

मुंबई शहर आणि उपनगराच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील मॉडेल टाऊन, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३ येथे वसलेल्या, असलेल्या आणि स्थित निवासी फ्लॅट्सच्या समाविष्टीत तळ + ४ वरील मजल्यांच्या २ विंग्स प्रत्येकी ए आणि बी विंग्सच्या समाविष्टीत वैभव अशा ज्ञात त्यावर उभारीत इमारतींसह गाव: आंबिवलीच्या दि. २९/०३/२०७१ रोजीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सर्वे क्र. १४१ए संलग्नित प्लॉट क्र. १४५ आणि १४६, सह संलग्नित सी.टी.एस. क्र. ८३३/९ आणि ८३३/१० प्रत्येकी मोजमापित ८३६ चौ. मी. किंवा तत्सम धारक जिल्हाधिकाऱ्यांच्या जमिनीचे ते सर्व भाग आणि विभाग, सीमाबद्धता पश्चिमेला: प्लॉट क्र. १४४ द्वारे, पूर्वेला: प्लॉट क्र. १४७ द्वारे, उत्तरेला: प्लॉट क्र. १४१ आणि १४२ द्वारे आणि दक्षिणेला: रोडद्वारे

सदर दिनांक १५ जून, २०२३. **ॲड. अर्चना एम. गवळी**

FEDERAL BANK
YOUR PERFECT BANKING PARTNER

शाखा: ठाणे/लुईसवाडी

फेडरल बँक लि. शाखा ठाणे लुईसवाडी, एलिव्हेटेड तळ मजला, मेझानाईन मजला, सन मॅग्नेटिका, एलआयसी सर्व्हिस रोड जवळ, लुईसवाडी, ठाणे पश्चिम ४०० ६०१,
ईमेल आयडी: MUMA@federalbank.co.in, फोन: ०२२-२५८१४४१७
सीआयएन: एल६५१९१केएल१९३१पीएलसी०००३६८ पॅन: AABCT0020H

सोने लिलाव/खाजगी विक्रीची सूचना

फेडरल बँक लिमिटेड, शाखा: ठाणे/लुईसवाडी कडे तारण ठेवलेले सोन्याचे दागिने खाली नमूद केलेल्या सुवर्ण कर्ज खाते क्रमांकांखाली सार्वजनिक लिलावात/खाजगी विक्रीत विकले जातील, कारण नियत तारखेनंतर आणि वारंवार सामान्य आणि नोंदणीकृत नोटीस देऊनही तारण ठेवलेल्या कर्जदारांनी सोने दागिने च्या विमोचन केली नाही. दागिन्यांचे नूतनीकरण / विमोचन करण्यासाठी सोने कर्ज खात्यांची पुर्तता करण्यासाठी लिलाव/खाजगी विक्रीच्या रकमेमध्ये काही कमतरता असल्यास, कर्जदाराच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाहीसह इतर वसुलीची पावले बँकेकडे थकबाकीची रक्कम पूर्णपणे त्याच्या खर्चावर आणि जोखमीवर वसूल करण्यासाठी सुरू केली जाईल.

स्थळ: फेडरल बँक लिमिटेड, एलिव्हेटेड तळ मजला, मेझानाईन मजला, सन मॅग्नेटिका, एलआयसी सर्व्हिस रोड जवळ, लुईसवाडी, ठाणे (पश्चिम), महाराष्ट्र-४०० ६०१.

सोन्याचा लिलाव/खाजगी विक्री तारीख: २७.०६.२०२३

सोने कर्ज खाते क्र.	गहाणवटदारांचे नाव
१७७५५६०००००५७४	श्री. नेमचंद अल्गो स्वर्णकार

फेडरल बँक लि. साठी
दिनांक: १४-०६-२०२३ **अधिकृत स्वाक्षरी**

जाहीर सूचना

जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते कि, आमचे अशील सौ. शीला बिपीन दोशी आणि श्री. बिपीन परमानंद दोशी हे येथे खालील परिशिष्टात नमूद फ्लॅट्सचे संयुक्त मालक आहेत. आमच्या अशिलांनी असे दर्शविले आहे कि, त्यांच्याकडून येथे खालील परिशिष्टात नमूद फ्लॅटच्या संदर्भातील नामाधिकार दस्तावेजांची खालील शृंखला हरवली किंवा गहाळ झाली आहे:-

१) पहिल्या भागाचे विकासक असे उल्लेखित त्यातील मे. लता कन्स्ट्रक्शन आणि इतर भागाचे फ्लॅट खरेदीदार असे उल्लेखित त्यातील सौ. शीला बिपीन दोशी आणि श्री. बिपीन पी. दोशी यांच्याद्वारे आणि दरम्यान निष्पादित दि. १४/०७/१९८७ रोजीच्या फ्लॅटचा विक्री करार; चित्रकार केतकर मार्ग, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे स्थित ओम मधुसूदन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या मालकीच्या ओम मधुसूदन इमारतीमधील बी विंग, १ला मजला, फ्लॅट क्र. बी-१०२.

आमचे अशील सौ. शीला बिपीन दोशी आणि श्री. बिपीन पी. दोशी यांनी वरील सदर नामाधिकार दस्तावेज म्हणजेच दि. १४/०७/१९८७ रोजीच्या फ्लॅटच्या मूळ विक्री करार हरवल्याबद्दल विले पार्ले पोलीस स्टेशन, मुंबई येथे पोलीस तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रार ही दिनांक २३/०५/२०२३ रोजीच्या अनु. क्र. ४२७८५/२०२३ अंतर्गत नोंदणीकृत आहे.

आमचे अशील याद्वारे कोणत्याही व्यक्ती ज्यांना खालील नमूद फ्लॅट किंवा त्यावरील कोणत्याही भागाकरिता किंवा मध्ये कोणत्याही प्रकारच्या करारांतर्गत, विक्री, परवाना, गहाण, धारणाधिकार, प्रभार, भेट, विश्वस्त, वारसा, उप-भाडेपट्टा, भाडेपट्टा अंतर्गत, अदलाबदल, सुविधाधिकार, प्रतिबंधित किंवा अन्य करार किंवा शर्ती, भार किंवा अन्य कसेही किंवा सदर फ्लॅटच्या मालकीविरोधात कोणत्याही आक्षेपाच्या मार्गे कोणतेही शेअर, हक्क, नामाधिकार, हितसंबंध असल्यास किंवा त्यांचा दावा असल्यास ते मागवीत आहेत. दावेदारांनी त्याचा/तिचा दावा पुरक दस्तावेजांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्याच्या/तिच्या दाव्याच्या पुराव्यासह सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविणे आवश्यक आहे. १४ दिवसांच्या आत कोणतेही दावे किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास तसे दावे अस्तित्वात नाही आणि सदर फ्लॅटकरिता आमचे अशील सौ. शीला बिपीन दोशी आणि श्री. बिपीन परमानंद दोशी यांचे नामाधिकार सर्व भार आणि प्रभारांपासून मुक्त आहेत असे गृहीत धरले जाईल.

मिळकतीचे परिशिष्ट

चित्रकार केतकर मार्ग, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे स्थित ओम मधुसूदन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या मालकीच्या ओम मधुसूदन इमारतीमधील बी विंग, १ला मजला, तो सर्व फ्लॅट क्र. बी-१०२.

सदर इमारतीची रचना ही गाव - विले पार्ले (पूर्व), तालुका - अंधेरी, जिल्हा - मुंबई उपनगराच्या टी. पी. एस. क्र. २ च्या सीटीएस क्र. ११६६ आणि ११६६(१) अंतिम प्लॉट क्र. २८८ धारक जमिनीच्या प्लॉटवर उभारीत आहे.

सदर दिनांक १४ जून, २०२३ रोजी.

सही/-
किर्ती नागदा ॲन्ड असोसिएट्स
वकील आणि नोटरी,
६०५, ६वा मजला, सी विंग, ईस्टर्न कोर्ट सीएचएस लि., **बरिस्ता हॉटेलच्या वर, तेजपाल** रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७

सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते कि, मी माझे अशील श्री. प्रजोत एच. जग्गी आणि सौ. सृष्टी प्रजोत जग्गी हे खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या सीटीएस क्र. ३९-ए आणि बी, एस. व्ही. रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई ४०० ०६२ धारक प्लॉटवर बांधकामित असलेल्या शिवम चेंबर्स अशा ज्ञात इमारतीमधील दुसरा मजला, युनिट क्र. २०३ ९यानंतर सदर युनिट असे उल्लेखित), क्रमांक ४९१ पासून ते ५०० (दोन्ही एकत्रित) प्रत्येकी रु. ५०/- च्या १० शेअर्सच्या शेअर प्रमाणपत्र क्र. ०५० मधील त्यांचे मालकी हक्कांच्या संदर्भात श्री. सी. ए. अँटो आणि श्री. एस. व्ही. नेगांधी यांच्या नामाधिकारांची तपासणी करत आहे.

सर्व व्यक्तींना वरील परिसराच्या विरोधात किंवा त्याकरिता विक्री, अभिहस्तांकन, अदलाबदल, हस्तांतर, वाटप, भेट, वारसा, गहाण, प्रभार, धारणाधिकार, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, काळजीवाहू तत्वे, विश्वस्त, निर्वाह, ताबा, वापर, भोगवटा, सुविधाधिकार, व्यवस्था किंवा करार किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे कोणतेही हक्क आणि/किंवा वाद, खटला, हुकूम, आदेश, प्रतिबंधित करार, निषेधाज्ञा, जमी किंवा अन्य कोणत्याही दाव्याच्या मार्गे कोणताही दावा असल्यास कृपया तसे लिखित स्वरूपात निम्नस्वाक्षरीकारांना त्याच्या पुरक दस्तावेजी पुराव्यासह सदर प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या कालावधीत कळवावे. कसूर केल्यास, तसा तशा व्यक्तींचे दावा किंवा दावे जर काही असल्यास ते त्यागित आणि/किंवा परित्यागीत आणि/किंवा सोडून दिल्याचे किंवा अस्तित्वात नसल्याचे मानले जाईल आणि विक्री पूर्ण होईल.

पल्लवी अशोक कुलकर्णी
वकील उच्च न्यायालय
कार्यालय क्र. १०, बियुमोन चेंबर्स,
पहिला मजला, कॅफे मिलिटरीजवळ,
एन. एम. रोड, फोर्ट,
दिनांक: १५/०६/२०२३. मुंबई - ४०० ००१.

SBI भारतीय स्टेट बैंक State Bank of India

रिटेल ॲसेट सेंट्रलाईज्ड प्रोसेसिंग सेंटर ठाणे
दोस्ती पिनॅकल, गाळा क्र. ३, प्लॉट ई७, रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, सर्कल क्र. २२, ठाणे (प) ४०० ६०४. ईमेल : rasecc.thane@sbi.co.in

मागणी सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील कर्जदार यांनी बँकेकडून त्यांनी घेतलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल आणि व्याजाचा परतावा करण्यास कसूर आणि कर्ज नॉन परफार्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत सूचना त्यांना जारी करण्यात आल्या होत्या. परंतु त्या न बजावता परत आल्या आणि म्हणून सदर जाहीर सूचनेच्या मार्गाने याद्वारे तशा कर्जदारांना कळविण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव आणि पत्ता खाता क्र.	तारण मत्तेचा तपशील	१३(२) सूचनेची तारीख	एकुण थकबाकी
१	**श्री. विक्रम पालाभाई चुच्छर / श्री. गोविंदभाई पालाभाई चुच्छर,** ७०५/बी, मेरिगोल्ड सीएचएस, राम मंदिर रोड, वझिरा नाका, बोरिवली पश्चिम - ४०००९१, (घर कर्ज खाते - ४१०३७१६२८१७, ४१०१७०९२५१३, ४१०३९७५६८२०)	फ्लॅट क्र. ७०५, ७ वा मजला, बी-विंग, मेरिगोल्ड सीएचएस सीटीएस क्र. ३६२, गाव-एकसर, हेरिटेज हॉटेलसमोर, राम मंदिर रोड, वझिरा नाका, बोरिवली पश्चिम -४०००९१ (मुंबई)	०६/०६/२०२३ एनपीए तारीख : ०५/०६/२०२३	रु. १,५८,०३,१५८/- ०६/०६/२०२३ रोजीस
२	**श्री. विनोद कुमार विद्या पाठक / सौ. शारदा विनोद कुमार पाठक,** शहा निवास, खोली क्र. ०१, ठाकर अपार्टमेंट जवळ, पाडा क्रमांक ४, लोकमान्य नगर, ठाणे-४००६०६, (घर कर्ज खाते - ३७४८७६४५७२५, ३७४८७९२५०७५)	फ्लॅट क्र. ११०, १ ला मजला, इमारत क्रमांक-पेंटा १, प्रकार-२, पेंटागॉन एन्क्लेव्ह, प्लॉट क्र. १ आणि ५, गाव-आसनगाव, तालुका-शहापूर, ठाणे -४२१६०१	०८/०६/२०२३ एनपीए तारीख: २२/०२/२०२१	रु. १७,१३,२७६/- ०८/०६/२०२३ रोजीस

सूचनेच्या पर्यायी बजावणीकरिता पावले उचलण्यात येत आहेत. वरील कर्जदार आणि/किंवा त्यांचे हमीदार (प्रयोज्य तेथे) यांना सदर सूचना प्रसिद्धी तारखेपासून ६० दिवसात थकबाकी रक्कम अदा करण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे, कसूर केल्यास सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३ च्या पोट-कलम (४) अन्वये सदर सूचनेच्या ६० दिवसांच्या समाप्तीनंतर पुढील पावले उचलण्यात येतील.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

दिनांक : १४/०६/२०२३, ठिकाण : ठाणे **प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया**

JSW Steel Limited

कॉर्पोरेट आयडेन्टिफिकेशन नं. (सीआयएन) : एल२७१०२एमएच१९९४पीएलसी१५२९२५
नों. कार्यालय : जेएसडब्ल्यु सेंटर, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१
दू : ०२२-४२८६ १०००, फॅक्स : ०२२-४२८६ ३०००, ईमेल : jswsl.investor@jsw.in, वेबसाईट : www.jsw.in

सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ११० सहवाचता कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २२ (सध्या प्रचलित असलेल्या त्याच्या कोणत्याही वैधानिक दुरुस्त्या किंवा पुनर्अधिनियमितींसह) आणि सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ चे रेग्युलेशन ४४ ला अनुसरून कंपनीने खालील विषयांसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून/ई-व्होटींग प्रक्रियेने मंजुरी मिळवण्यासाठी शुक्रवार, ९ जून, २०२३ रोजी केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड **'आरटीए/केफिन'** ने ठेवलेल्या प्रत्यक्ष भागधारकांसाठीच्या नोंदीत/सभासदांच्या कंपनीच्या नोंदवहीत लाभार्थी मालक/सभासद म्हणून आणि डिमॅट साठी डिपॉझिटरीज म्हणजेच नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड **'एनएसडीएल'** आणि सेंट्रल डिपॉझिटरीज सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड **'सीडीएसएल'** कडे ज्यांची नावे आढळली त्या सर्व सभासदांना ई-मेल ने बुधवार, १४ जून, २०२३ रोजी टपाल मतदान सूचना पाठवणे पूर्ण केले आहे :

बाब क्र.	सामान्य/विशेष ठरावाचे वर्णन
१.	कंपनीच्या एक स्वतंत्र संचालक म्हणून सौ. निरुपमा राव (डीआयएन : ०६९५४८७९) यांची पुनर्नियुक्ती
२.	कंपनीचे एक संचालक म्हणून श्री. गजराज सिंग राठोर (डीआयएन : ०१०४२२३२) यांची पुनर्नियुक्ती
३.	कंपनीचे पूर्ण वेळ संचालक म्हणून श्री. गजराज सिंग राठोर (डीआयएन : ०१०४२२३२) यांची पुनर्नियुक्ती
४.	जिंदाल सॉ लिमिटेड शी महत्वाच्या संबंधित पक्षकार व्यवहार उपक्रमासाठी मंजुरी
५.	पिओंबिनो स्टील लिमिटेड शी महत्वाच्या संबंधित पक्षकार व्यवहार उपक्रमासाठी मंजुरी
६.	जेएसडब्ल्यु स्टील कोटेड प्रॉडक्टस लिमिटेड, कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी आणि भूषण पॉवर अँड स्टील लिमिटेड, कंपनीची एक अप्रत्यक्ष उपकंपनी यांच्यातील महत्त्वाच्या संबंधित पक्षकार व्यवहारांसाठी मंजुरी.

निगम व्यवहार मंत्रालय, भारत सरकारकडून जारी करण्यात आलेल्या ८ एप्रिल, २०२० दिनांकित जनरल सर्क्युलर्स क्र. १४/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित १७/२०२०, १५ जून, २०२० दिनांकित २२/२०२०, २८ सप्टेंबर, २०२० दिनांकित ३३/२०२०, ३१ डिसेंबर, २०२० दिनांकित ३९/२०२०, २३ जून, २०२१ दिनांकित १०/२०२१, ८ सप्टेंबर, २०२१ दिनांकित २०/२०२१, ५ मे, २०२२ दिनांकित ०२/२०२२ आणि २८ डिसेंबर, २०२२ दिनांकित ११/२०२२ ला अनुसरून सभासदांना टपाल मतपत्रिका आणि आगाऊ टपाल खर्च प्रदान केलेल्या व्यावसायीक उत्तरादाखल पाकिटासहीत टपाल मतदान सूचनेची हार्ड कॉपी पाठवली जाणार नाही. सभासदांच्या होकार किंवा नकाराचे दळणवळण फक्त रिमोट ई-व्होटींग सिस्टीमने होईल.

सभासदांचे मतदान अधिकार (रिमोट ई-व्होटींग मार्फत) ह्या कारणास्तव 'कट-ऑफ डेट' असलेल्या शुक्रवार, ९ जून, २०२३ (दिवसाच्या अखेरीस) रोजी त्यांनी धारण केलेल्या समभागांच्या संबंधात गणले जातील. कोणताही सभासद जो 'कट-ऑफ डेट रोजीस सभासद नसेल त्याने ही सूचना फक्त माहीतीसाठी दिल्याचे समजावे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८, ११० च्या तरतुदी आणि असल्यास अन्य कोणत्याही प्रयोज्य तरतुदी आणि सुधारित, कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या अनुपालनांत, सभासदांना सूचनेत मांडलेल्या सर्व ठरावांवर केफिन ने पुरवलेल्या ई-व्होटींग सेवे मार्फत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचे मत देण्याची सुविधा पुरवली आहे.

मतदानासाठी ई-व्होटींग पोर्टल गुरुवार, १५ जून, २०२३ (स. ९.०० वा. भाप्रवे) पासून शुक्रवार, १४ जुलै, २०२३ (सं. ५:०० वा. भाप्रवे) पर्यंत (दोन्ही दिवस धरून) खुले राहील. ह्या कालावधीत, शुक्रवार, ९ जून, २०२३ रोजीस एकतर प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचे मत देऊ शकतील. त्यानंतर मतदानासाठी केफिन कडून ई-व्होटींग मॉड्युल निष्क्रिय केले जाईल.

ज्यांचे एजंट म्हणजेच केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड कडे नोंदवले आहेत त्या कंपनीच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सदर टपाल मतदान सूचना पाठवली आहे.

टपाल मतदानाची सूचना कंपनीची वेबसाईट म्हणजेच, www.jsw.in, स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईटस् www.bseindia.com व www.nseindia.com वर आणि ''आरटीए'' (केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड) ची वेबसाईट https://evoting.kfintech.com येथून डाऊनलोड करता येईल.

सभासदांचे मतदान अधिकार सभासदांची नोंदवही/डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी स्थानाप्रमाणे ९ जून, २०२३ रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांनी धारण केलेल्या हिश्श्याच्या प्रमाणांत असतील. ९ जून, २०२३ रोजीस जी व्यक्ती सभासद नसेल तीने ही सूचना फक्त माहितीसाठी दिल्याचे समजावे.

संचालक मंडळाने टपाल मतदान/ई-व्होटींग प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून श्री. निलेश शाह, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी (सभासदत्व क्र. एफसीएस ४५५४/सीपी.२६३१) यांची नियुक्ती केली आहे.

जे सभासद प्रत्यक्ष स्वरुपांत शेअर्स धारण करतात आणि ज्यांचा ईमेल ॲड्रेस कंपनी/आरटीए कडे नोंदवला नसेल ते तो १६ मार्च, २०२३ दिनांकीत सेबी सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी-१/पी/सीआयआर/२०२३/३७ च्या बाबतीत त्यांचे केवायसी पूर्ण करून नोंदवू शकतात. सभासद पुढील लिंक : https://www.jswsteel.in/investors/downloads वरून केवायसी फॉर्म्स डाऊनलोड करू शकतात. ज्या सभासदांचे शेअर्स डिमॅट स्वरुपांत आहेत ते त्यांचे ई-मेल ॲड्रेस/अन्य तपशील अद्ययावत करण्यासाठी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटशी संपर्क साधू शकतात.

ई-व्होटींग चा निकाल ई-व्होटींग संपल्याच्या तारखेपासून दोन कामाच्या दिवसांत तपासणी अधिकाऱ्यांच्या अहवालासोबत कंपनीची वेबसाईट म्हणजेच, www.jsw.in तसेच स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या वेबसाईटस् अनुक्रमे www.bseindia.com व www.nseindia.com वर आणि 'आरटीए' (केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड) ची वेबसाईट https://evoting.kfintech.com वर टाकून घोषित केला जाईल.

इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाशी संबंधित कोणत्याही तक्रारी/चौकशी साठी सभासद निम्नस्वाक्षरीकारांशी einward.ris@kfintech.com किंवा jswsl.investor@jsw.in वर संपर्क साधू शकतात किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात लिहू शकतात.

जेएसडब्ल्यु स्टील लिमिटेड साठी
सही/-
ठिकाण : मुंबई **लॅन्सी व्हर्गीस**
दिनांक : १४.०६.२०२३ **कंपनी सेक्रेटरी**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट ब्रांच :
१०४, तळ मजला, भारत हाऊस, मुंबई, समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर: ०२२-२२६१५२०१ **ईमेल:** samvmumbai@unionbankofindia.bank

कब्जा सूचना
(नियम-८(१) पहा) (स्थावर व जंगम मिळकतीकरिता)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता, **युनियन बँक ऑफ इंडिया** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट), रुल्स २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२८.१२.२०२३** रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार **मे. वैश्विक फुड प्रा लि.** यांना सदर सूचनेत नमूद रक्कम **रु. ६४,